# पर्यावरणीय साहित्य : एक चिकित्सक अभ्यास

**मुरलीधर बापुराव गवळी**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
श्री निकेतन आर्टस् कॉमर्स कॉलेज, नागपूर
भ्रमणध्वनी – ९७६३९७७०२८
ई – मेल : mgawali1972@gmail.com

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i1.89

---

**सारांश *(Abstract)* :**

*सध्याच्या वर्तमानयुगामध्ये पर्यावरणीय संकटे ही केवळ भौगोलिक आणि वैज्ञानिक समस्या न राहता ती वैश्विक पातळीवर मानवी संस्कृती, समाजव्यवस्था आणि मूल्येंव्यवस्थेची संस्कृती, समाजव्यवस्था आणि गंभीर स्वरूपाची समस्या निर्माण होत आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण, भांडवलशाही अर्थव्यवस्था, लोकसंख्येचा विस्फोट, चंगळवाद आणि भोगवादी जीवनशैली यामुळे दिवसेंदिवस निसर्गाचा अमर्याद ऱ्हास होतांना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणीय साहित्य जाणीव जागृत करण्याचे महत्वपूर्ण कार्य करतांना दिसते. पर्यावरणीय साहित्य हे निसर्ग आणि मानवी यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करणारे, पर्यावरणीय ऱ्हासाविषयी संवेदना निर्माण करणारे आणि निसर्गसंबंधचा संदेश देणारे साहित्य आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये पर्यावरणीय साहित्याची संकल्पना, त्याची वैशिष्टे, मराठी साहित्यातील पर्यावरणीय जाणीव आणि पर्यावरणीय साहित्याचा सामाजिक आशय याचा चिकित्सक तपशीलवार अभ्यास करण्यात आला आहे.*

*आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये पर्यावरणीय संकटे अधिक तीव्र होत चालली आहे. हवामान बदल, भौतिक संसाधने, प्रदूषण, जंगलतोड, पाणीटंचाई आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या मानवी विश्वासमोर आव्हानात्मक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर साहित्याच्या माध्यमातून मानवी जगतामध्ये पर्यावारणीय जाणीव जागृत करण्याचे कार्य करते. पर्यावरणीय साहित्य हे मानव आणि निसर्ग यांच्यातील नातेसंबंध स्पष्ट करणारे, पर्यावरणीय ऱ्हासाविषयी चिंता व्यक्त करणारे आणि संवर्धनाचा संदेश देणारे साहित्य आहे. या संशोधनात्मक लेखामध्ये संकल्पना, उद्दिष्ट्ये, वैशिष्ट्ये मराठी साहित्यातील योगदान आणि त्याचा सामाजिक आशय या दृष्टीने डोळसपणे आणि सैद्धान्तिक दृष्ट्या अभ्यास करण्यात आला आहे.*

**कीवर्ड्स :** पर्यावरण, पर्यावरणीय साहित्य, निसर्ग, संवर्धन, मराठी साहित्य, सामाजिक आशय.

---

**प्रास्ताविक :**

मानव आणि निसर्ग यांचे अद्वैत असे नातेसंबंध असून एकमेकांवर आधारित आहे. मानवाचे अस्तित्व

निसर्गावर अवलंबून असून सुद्धा मानवाने विकासाच्या नावाखाली निसर्गाचा ऱ्हास करण्यास सुरूवात केली. औद्योगिक क्रांतीनंतर कारखाने, मोठी शहरे, वाहतूक व्यवस्था आणि तंत्रज्ञानाचा अतिरेक वाढला. त्याचा परिणाम म्हणजे हवा, पाणी, माती, जंगल आणि जैवविविधता यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. पर्यावरणाचा जागतिक स्तरावर विचार केला तर तापमान वाढ, हवामान बदल, पाणी टंचाई, प्रदूषण आणि नैसर्गिक संकट यांनी मानवी जीवन ग्रासून टाकले असले तरी या सर्व समस्थांच्या मुळाशी मानवीची स्वार्थी प्रवृत्ती आणि कृती आहे. अशा परिस्थितीमध्ये समाज जागृतीचे प्रभावी माध्यम म्हणून पर्यावरणीय साहित्याचे फार मोठे मोलाचे योगदान आहे. साहित्य हे मानवांच्या भावनांवर, विचारांवर आणि मूल्यांवर परिणाम घडवते. त्यामुळे पर्यावरणाच्या प्रश्नाविषयी जनजागृती करण्यामध्ये साहित्याची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. पर्यावरणीय साहित्य हे अलीकडच्या कालखंडाध्ये अधिक विकसित झाले असून ते निसर्ग आणि मानव यांच्यातिल नातेसंबंधाबाबत चिंतन करण्यास प्रवृत्त करते.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

- पर्यावरणीय साहित्याची संकल्पना स्पष्ट करणे.
- पर्यावरणीय साहित्याची प्रमुख वैशिष्ट्ये अभ्यासणे.
- मराठी साहित्यातील पर्यावरणीय जाणिवांचा विकास अभ्यासणे.
- पर्यावरणीय साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक आशय विशद करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून संदर्भग्रंथ, साहित्यकृती, लेख, निबंध आणि समीक्षात्मक लेखन यांचा वापर करण्यात आला आहे.

**पर्यावरणीय साहित्याची संकल्पना :**

पर्यावरणीय साहित्य मानव केंद्रित राहता निसर्गकेंद्री दृष्टिकोन स्वीकारून निसर्ग, पर्यावरण, जैवविविधता, मानवी हस्तक्षेपामुळे होणारा ऱ्हास आणि पर्यावरण संवर्धनाचा विचार कलात्मक आणि वैचारिक पातळीवर मांडते. अशा साहित्याला पर्यावरणीय साहित्य असे म्हणतात.

**पर्यावरणीय साहित्याची वैशिष्ट्ये :**

- निसर्गाशी एकरूपता साधणारी दृष्टी.
- पर्यावरणीय समस्येच्या संदर्भात जागृती.
- मानवी अस्तित्वाचे आणि जबाबदरिचे भाग.
- वास्तववादी व चिंतनशील मांडणी.

- शाश्वत विकासाचा संदेश.

**पर्यावरणीय जाणीव :**

भारतीय संस्कृतीमध्ये निसर्गाला पूज्य मानले गेले आहे. वेद, उपनिषदे , पुराणे आणि प्राचीन ग्रंथामध्ये पृथ्वी, जल, वायू, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूतांना महत्वाचे स्थान दिलेले आहे. " माता भूमि:पुत्रो•हपृथ्विव्या." ही भावना पर्यावरणीय समतोलची जाणीव व्यक्त करणारी आहे. भारतीय जीवन दृष्टीमध्ये निसर्गाशी संघर्ष नसून सुसंवाद आढळतो.

**मराठी साहित्यातील पर्यावरणीय जाणीव :**

एकदंरीत मराठी साहित्यामध्ये पर्यावरणीय जाणीवांचे दर्शन विविध टप्प्यांतून घडतांना दिसते. संत ज्ञानेश्वरांच्या 'पसायदाना' मध्ये सर्व सृष्टीच्या कल्याणाची भवना व्यक्त होतांना दिसते. संत तुकारामांच्या अभंगातून निसर्ग आणि मानव यांची एकरूपता प्रकर्षाने जाणवते. 'वृक्षवल्ली आम्हा सोयिरे वनचरे पक्षी हे सुस्वरे आळविती |' आधुनिक काळामध्ये ना धो महानोर यांच्या काव्यामधून ग्रामीण जीवन, शेती, नद्या, झाडे आणि निसर्गाशी जोडलेली मानवी वेदना प्रभावीपणे जाणवते.

ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, दलित साहित्य आणि एकूणच सर्वच साहित्यप्रवाहामध्ये पर्यावरणीय प्रश्नांच्या संदर्भात चिंतनशील लेखन मांडले गेले आहेत. पाणी, जंगल, जमीन आणि उपजिविकेचे प्रश्न हे एकूणच साहित्याच्या केंद्रस्थानी आलेले आहेत.

**पर्यावरणीय साहित्याचा सामाजिक आंशय :**

पर्यावरणीय साहित्य हे मानवी जीवनाच्या समाजमनावर प्रभाव टाकून त्याला चिंतन करायला प्रवृत्त करते. समाजमनामध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचे काम साहित्याच्या माध्यमातून केल्या जाते. पर्यावरणाचे संगोपन आणि संवर्धन हे कायदयानी होणार नाही तर मानवी मनाचे मानसिक परिवर्तन होणे गरजेचे आहे. पर्यावरणाच्या संदर्भात मानसिक परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ साहित्यामध्ये आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

**निष्कर्ष :**

सध्याच्या या जागतिक वर्तमान युगामध्ये पर्यावरणीय साहित्य ही काळाची अपरिहार्य अशी गरज झाली आहे. वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर साहित्याच्या माध्यमातून निसर्गाचे संगोपन आणि संवर्धन करण्याचा संदेश वैश्विक पातळीवर पोहचविणे गरजेचे झालेले आहे. पर्यावरणाचे संतुलन बिघडलयामुळे विश्वातील समग्र मानवी जीवन धोक्यात आलेले आहे. मानवी जीवनातील हा यक्ष प्रश्न सोडवायचा असेल तर मानव आणि निसर्ग यांचा समतोल साधण्यासाठी, त्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी भविष्यात पर्यावरणीय

साहित्याची भूमिका अत्यंत मोलाची आणि महत्वाची ठरणार आहे.

**संदर्भ** :


- देशमुख ग.पां. पर्यावरण आणि साहित्य पुणे.
- मराठी संत साहित्य. निवडक अभंग व ओव्या.
- महानोर ना.धो. निवडक कविता.
- पर्यावरण विषयक विविध संशोधन लेख.
- घाटे, निरंजन-वेधन पर्यावरणाचा.
- कुळकर्णी दिलीप – हरित संदेश.
- पागनीस, रविकांत, पर्यावरणाची कथा आणि व्यथा.
- डॉ. धामधरे, एस.व्ही. पर्यावरण अभ्यास.